## आमंत्रण

आपणास कळविण्यात आनंद होतो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सव वर्षानिमित्त भारताच्या आर्थिक सक्षमीकरणात महिलांचा सहभाग या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन दि. २७ जानेवारी २०१८ रोजी करण्यात आले आहे. तरी आपला सहभाग नोंदवावा ही विनंती.

## परिसराची सांस्कृतिक ओळख

उस्मानाबाद जिल्ह्याचा इतिहास तेर या गावापासून पाहता येतो. वारकरी संतमेळ्यातील संत गोरा कुंभार (गोरोबा काका) तेर येथीलच रहिवाशी होते. येथे गोरोबा काकाची समाधी असल्याने चैत्र महिन्याच्या कृष्ण पक्षात मोठी यात्रा भरते. उस्मानाबाद शहराच्या दक्षिणेस ४ कि.मी. अंतरावर जैन, हिंदू, बौद्ध लेण्या असून धाराशिव लेणी म्हणून त्या प्रसिद्ध आहेत. शिवाय येथे ख्वाजा शम्सुद्दिन गाजी यांचा दर्गा असून दर वर्षी येथे ऊरुसाची यात्रा भरते. तसेच जिल्ह्यातील श्रीक्षेत्र तुळजापूर हे साडेतीन शक्तीपीठातील एक शक्तीपीठ मानले जाते. तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी नवरात्रात महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक येथून लाखो भाविक येतात. छत्रपती शिवाजी महाराज यांना तुळजाभवानी देवीने तलवार दिली. हे मंदीर केवळ हिंदूंचेच तीर्थक्षेत्र नाही; तर सर्व धर्मियांचे तीर्थक्षेत्र मानले जाते. तसेच येरमाळा येथील येडेश्वरी देवीची यात्रा सुद्धा चैत्र नवरात्रीमध्ये मोठ्या भक्तीभावाने आयोजित करण्यात येते.

कळंब नगरीचा भौगोलिक इतिहास संपन्न असून मांजरा नदीतीरावर वसलेले हे शहर आहे. प्राचीनकाळी या परिसरात कदंब वृक्षाची बनराई होती. नदीच्या तीरावर प्राचीन महादेव मंदीर, दक्षिणमुखी हनुमान मंदीर असून सर्व धर्मभाव प्रस्थापित करणारा तहसिलदार बाबा यांचा दर्गा येथेच आहे. मन्मथ स्वामी यांचा जन्म येथेच झाला. एकूणच ऐतिहासिक परंपरा असलेले हे शहर आहे. तसेच ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक गणपतरावजी कथले व परिसरातील अनेक स्वातंत्र्य सैनिक याच भागात होऊन गेले.

## संस्था व महाविद्यालयासंबंधी

शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर गुरूजींनी ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळाची स्थापना १९५२ मध्ये संत नामदेवांच्या 'ज्ञानदीप लावू जगी' वचनाप्रमाणे केली. ज्ञानप्रसारक मंडळ, येरमाळा संचलित या महाविद्यालयाची स्थापना जून १९६९ मध्ये झाली. या काळात कळंब तालुक्यात उच्च शिक्षणाची कसलीच व्यवस्था नव्हती. असाक्षर, निरक्षर, गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी या उद्देशाने महाविद्यालयाची स्थापना झाली.

आमचे महाविद्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद विभागात प्रयोगशील महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान शाखांमध्ये अध्यापन केले जाते. तर पदव्युत्तर स्तरावर कला विभागातील मराठी, इतिहास, भुगोल; तर विज्ञान विभागांतर्गत प्राणीशास्त्र व औषध निर्माणशास्त्राचे अध्यापन केले जाते. संशोधन केंद्र म्हणून प्राणीशास्त्र विषयाला मान्यता मिळाली आहे. या शिवाय बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स व विविध व्यावसायाभिमुख अभ्यासक्रमही शिकवले जातात. अतिथीगृह, विद्यार्थी वसतिगृह, खेळांसाठी भव्य मैदान, अद्ययावत जिम्नॅशियम पदवी व पदव्युत्तर विभागासाठी समृद्ध ग्रंथालय, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र आहे. विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सकाळी ७ ते रात्री ७ वाजेपर्यंत खुली ठेवली जाते. आमच्या महाविद्यालयात ग्रामीण परिसरातील होतकरू, गरीब व हुशार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यक्तिमत्व विकासासाठी सातत्याने नवनवीन उपक्रम राबवले जातात.

## चर्चासत्रा संदर्भात

भारताच्या अर्थव्यवस्थेचे सक्षमीकरण करण्यासाठी महिलांनी कृषी, उद्योग, सेवा क्षेत्रात तसेच स्वयंसहाय्यता बचत गट, ग्रामीण अर्थव्यवस्था, लघुउद्योग, कुटीरोद्योग, प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय व्यापार इत्यादींच्या माध्यमातून आपला सहभाग नोंदवला आहे. तसेच या सर्व क्षेत्रात महिलांना काम करण्यासाठी संधी मिळत आहे. परंतु महिलांना काम करण्यासाठी येणा-या समस्या, अडचणी, आव्हाने व त्यावरील उपाय योजना सुचविण्यासाठी आणि ख-या अर्थाने भारतीय महिला या आर्थिक दृष्ट्या आज सक्षम आहेत का? हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे या गोष्टीचा उहापोह व चर्चा संशोधक विद्यार्थी, सुज्ञ नागरिक, प्राध्यापक, नामवंतानी करावी यासाठी हा विषय राष्ट्रीय चर्चासत्रासाठी ठेवण्यात आला आहे.

## चर्चासत्राचा विषय

भारताच्या आर्थिक सक्षमीकरणात महिलांचा सहभाग

## चर्चासत्राचे उपविषय

१) कृषी उद्योग व सेवा क्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम
२) ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचा सहभाग
३) बचत गट आणि महिला सबलीकरण
४) भारतीय अर्थव्यवस्था व महिला
५) नोटबंदीचा महिलांच्या आर्थीक स्थीतीवर झालेला परिणाम
६) औद्योगिक क्षेत्रात महिलांचे योगदान
७) लघु व कुटीर उद्योगात महिलांचा सहभाग
८) सेवा क्षेत्रात महिलांचा वाढता सहभाग
९) महिलांच्या आर्थिक समस्या व उपाय योजना
१०) आंतरराष्ट्रीय व्यापार आणि महिला

या विषयाच्या अनुषंगाने वरील उपविषयावर शोधनिबंध तयार करून पाठवावेत. चर्चासत्रासाठी पाठविलेले शोधनिबंध UGC Approved Journal "Chronicle of Humanities and Cultural Studies" (ISSN : 2454-5503) या Impact Factor असलेल्या शोधनिबंध पुस्तिकेमध्ये प्रकाशित केले जातील.

सुचना :

१) शोधनिबंध मराठी व हिंदी साठी MS-Word, ISM DVB-TT Surekh, Kruti Dev 010 Font Size 16 मध्ये व इंग्रजीसाठी Times New Roman Font Size 12 मध्ये असणे आवश्यक आहे. शोधनिबंध २००० शब्दापेक्षा मोठा नसावा.

२) आपले शोधनिबंध jadhavminakshi83@gmail.com या ईमेल वर पाठवावेत. कृपया पेपर पाठवताना त्यासोबत आपण भरलेल्या नोंदणी शुल्काची पावती स्कॅन करून ईमेल करावी.

३) चर्चासत्राचे नोंदणी शुल्क प्राध्यापकासाठी रू. १०००/- व संशोधक विद्यार्थी साठी रू. ६००/- राहील. नोंदणी शुल्क भरल्याशिवाय पेपर प्रकाशित केला जाणार नाही. शोधनिबंध वाचण्यासाठी व सहभागासाठी स्पॉट नोंदणी सुद्धा उपलब्ध राहील.

४) आपण आपले नोंदणी शुल्क प्राचार्य शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब यांच्या नावाने महाराष्ट्र ग्रामीण बँक कळंब या बँकेचा देय असलेला डी.डी. RTGS / NEFT पाठवू शकता किंवा ऑनलाईन बँकींगद्वारे खालील पत्त्यावर नोंदणी शुल्क पाठवावे.

**Ac Name : Principal Dnyandeo Mohekar Mahavidyalaya Kalamb**
**Ac No. : 54406000066 Bank : Maharashtra Gramin Bank Branch Kalamb IFSC Cose : MAHG0004406 MICR Code : 413570640**

५) आपले शोधनिबंध दि. १२ जानेवारी २०१८ पर्यंत तयार करून पाठवावेत.

## मार्गदर्शन समिती

- श्री अंकुशराव बारकुल (उपाध्यक्ष, ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा)
- श्री भागवत शंकर गव्हाणे (सहसचिव, ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा)
- डॉ. डी. एस. जाधव (संचालक, ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा)
- प्रा. श्रीहरी बोबडे (संचालक, ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा)
- प्रा. जी. यु. घोलप (उपप्राचार्य, शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब)
- प्रा. डी. बी. गपाट (उपप्राचार्य, शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब)
- डॉ. व्ही. एस. अनिगुंठे (भुगोल विभाग प्रमुख, शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब)

## राष्ट्रीय सल्लागार समिती

| | |
|---|---|
| डॉ. व्ही. बी. भिसे (औरंगाबाद) | डॉ. एस. टी. सांगळे (मुंबई) |
| डॉ. धनश्री महाजन (औरंगाबाद) | डॉ. भारत खंदारे (मंठा) |
| डॉ. बिलास खंदारे (औरंगाबाद) | डॉ. सुनिल नरवडे (औरंगाबाद) |
| डॉ. सी. एन. कोकाटे (औरंगाबाद) | डॉ. सुरेश मेंद (मुंबई) |
| प्रो. सुभाष कोंबडे (कोल्हापूर) | डॉ. कृतिका खंदारे (औरंगाबाद) |
| प्रा. वसुधा नंदनवार (पुणे) | डॉ. सुभाष सावंत (नाशिक) |
| डॉ. विनित पटेल (उत्तरप्रदेश) | डॉ. टी. एल. बारबोले (तुळजापुर) |
| डॉ. ए. एन. पवार (बार्शी) | प्रा. ए. बी. नरवडे (कळंब) |
| डॉ. बेलोरे सर (नांदेड) | |

## संयोजन समिती

| | |
|---|---|
| श्री एस. एस. जाधव | प्रा. डॉ. बी. एन. गपाट |
| डॉ. एच. के. भगवान | डॉ. एस. आर. कांबळे |
| डॉ. डी. ई. गुंडरे | डॉ. एम. डी. गायकवाड |
| डॉ. डी. एन. चिंते | डॉ. डी. एस. सूर्यवंशी |
| प्रा. ए. एस. शिंदे | प्रा. बी. एस. गंभीरे |
| प्रा. श्रीमती ए. ए. काकडे | डॉ. के. डी. जाधव |
| प्रा. एन. एम. अंकुशराव | प्रा. एस. ए. मिटकरी |
| डॉ. के. एल. काळवणे | डॉ. डी. एस. साकोळे |
| डॉ. एस. जी. वेदपाठक | प्रा. के. बी. डोके |
| प्रा. ए. एस. खांडके | प्रा. सौ. अर्चना मुखेडकर |
| प्रा. जे. एच. काझी | प्रा. डॉ. एस. एन. लोमटे |
| प्रा. डॉ. ए. व्ही. बोंदर | प्रा. एन. एम. आदाटे |
| प्रा. एच. डी. चांदोरे | प्रा. बी. एस. सावंत |
| डॉ. जयवंत ढोले | डॉ. आर. व्ही. ताटीपामुल |
| डॉ. एच. एल. चौधरी | श्री आर. व्ही. वीर |
| प्रा. एस. एफ. शेख | प्रा. श्रीमती एस. एच. मडके |

## संगणक व दृकश्राव्य तंत्रसंयोजन

| | |
|---|---|
| प्रा. आर. एस. भिसे | श्री ए. ए. शिंदे |
| श्री व्ही. के. खरात | श्री एस. व्ही. मोरे |


**चर्चासत्र समन्वयक**
**श्रीमती प्रा. डॉ. एम. बी. जाधव**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब
E-mail : jadhavminakshi83@gmail.com
Mo. No. 8381096085

**प्रोफेसर बी. ए. चोपडे**
कुलगुरू,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**डॉ. वाल्मिक सरवदे**
विशेष कार्यासन अधिकारी
डॉ. बा. आं. म. वि. औरंगाबाद

**डॉ. मंगला खिंवसरा**
औरंगाबाद

**डॉ. स्मिता शहापुरकर**
उस्मानाबाद

**डॉ. सुर्यकांत जगदाळे**
माजी प्राचार्य
कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, बाशी

**श्री आबासाहेब बारकुल**
अध्यक्ष
ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा

**डॉ. अशोकराव मोहेकर**
सचिव
ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा

**डॉ. पुरूषोत्तम देशमुख**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

**डॉ. सुनिल पवार**
प्र. प्राचार्य
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब




**राष्ट्रीय चर्चासत्र : भारताच्या आर्थिक सक्षमीकरणात महिलांचा सहभाग**

**दिनांक २७ जानेवारी २०१८**

बुक-पोस्ट

प्रति,

प्रेषक :
डॉ. अशोकराव मोहेकर
प्राचार्य, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय,
ता. कळंब, जि. उस्मानाबाद - ४१३ ५०७ (महा.)
दूरध्वनी : (०२४७३) २६२१४२



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**
व
# शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय
यांच्या संयुक्त विद्यमाने
महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त
# एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

## अर्थशास्त्र विभाग आयोजित
# भारताच्या आर्थिक सक्षमीकरणात महिलांचा सहभाग

*– आयोजक –*
**डॉ. अशोकराव मोहेकर**
प्राचार्य, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय,
ता. कळंब, जि. उस्मानाबाद - ४१३ ५०७ (महा.)
दूरध्वनी : (०२४७३) २६२१४२
E-mail : smdmmkl@gmail.com
Visit us : www.mohekarcollege.org